# प्रसिध्दी पत्रक

दिनांक 09/12/2025

**आरोपी लोकसेवक** - श्री. पांडुरंग बेलेकर, लेखा अधिकारी (शिक्षण), जालना (वर्ग -2) यांनी तक्रारदार यांचे कडे 6,000/- (सहा हजार रुपये) लाच मागणी केल्याने आरोपी लोकसेवक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे तालुका जालना, जि. जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| आलोसे यांचे नाव व पत्ता | श्री. पांडुरंग बेलेकर वय 47 वर्ष, रा. निरामय हॉस्पिटल समोर निसर्ग कॉलनी, तारांगण जालना, व्यवसाय :- नौकरी, पद - लेखा अधिकारी (शिक्षण) जालना (वर्ग -2) |
| लाच मागणी रक्कम | 6,000/- (सहा हजार रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | निरंक |
| सापळा अधिकारी<br>तपास अधिकारी | श्री. राजु नांगलोत, पोलिस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर.<br>श्री.बाळासाहेब शिंदे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागण्याचा हेतु | यातील आलोसे यांनी तक्रारदार यांचे वरिष्ठ वेतन श्रेणीतील वेतन निश्चितीची पडताळणी करून सेवा पटावर सही करण्यासाठी सहा हजार रुपये लाचेची मागणी केली. तक्रारदारास लाच रक्कम द्यायची इच्छा नसल्याने त्यांनी ला.प्र.वि. कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे तक्रार नोंदवली होती. |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने अनुषंगाने दिनांक 07/10/2025 रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता आलोसे यांनी तक्रार दार यांना वरिष्ठ वेतन श्रेणीतील वेतन निश्चिती पडताळणी करून सेवापटावर सही करण्यासाठी 6000 ₹ लाचेची मागणी करून स्वीकारण्याचे मान्य केले.<br>आलोसे यांनी लाच मागणी केल्यानंतर दिनांक 08/10/2025 रोजी पंचासमक्ष सापळा कारवाई आजमावली असता, आरोपी लोकसेवक पांडुरंग बेलेकर आलोसे यांना तक्रारदार यांचा संशय आल्याने त्यांनी लाच रक्कम स्वीकारली नाही.<br>आलोसे यांचे राहते घराची घरझडती घेण्याची प्रक्रीया सुरु आहे तसेच आलोसे यांच्या विरुध्द पोलीस ठाणे तालुका जालना , जि. जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर सापळा कारवाई ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांनी केलेली आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री.शशिकांत सिंगारे, पोलीस उप अधीक्षक श्री राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरिक्षक श्री राजु नांगलोत यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी पोलीस निरीक्षक श्री.धर्मराज बांगर, पोह/ भिमराज जिवडे, साईनाथ तोडकर, पो.अंम.युवराज हिवाळे, चालक पोअ/ रामेश्वर ताटे ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर

ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205

पोलीस उप अधीक्षक :- 9823498777 व्हॉटसअप क्रमांक :- 7720891064

(राजीव आ.तळेकर)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
छत्रपती संभाजीनगर